## प्रेसनोट दिनांक १६/०७/२०१९
## पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

**हरविलेल्या ६० वर्षांचे वयोवृध्द महिलेच्या मुलाचा फेसबुकच्या आधारे शोध घेवून येरवडा पोलीसांनी सदर महिलेस तिचे मुलाचे ताब्यात दिले.**

---

दिनांक १६/०७/२०१९ रोजी दुपारी ०३/०० वा.चे सुमारास एका रिक्षा चालकाने जेलरोड पोलीस चौकी येथे त्याचे रिक्षातून एका वयोवृध्द महिलेस आणून जेल रोड चौकीचे सहा.पो.निरी. श्री. राहूल गिरमकर यांचे समक्ष हजर केले व त्यांना कळविले की, सदरची महिला ही शिवाजीनगर, पुणे येथून रिक्षात बसली असून, तिला तिचा पत्ता, नातेवाईकांचा संपर्क क्रमांक सांगता येत नसून ती हरविलेली असल्याचे दिसून येत आहे. त्यावरून स.पो.निरी.श्री. राहूल गिरमकर व त्यांचे रायटर पो.हवा. ३३५७ नामदेव सुपे, पो.ना. २९८८ किसन भारमळ, पो.शि. राजेंद्र ढोणे यांनी सदर महिलेकडे विचारपूस केली असता सदर महिलेने तिचे नाव- शामल दत्तात्रय पुंडले, वय ६० वर्षे असे असल्याचे सांगितले. तिचेकडे तिचे नातेवाईकांबाबत विचारपूस केली असता तिने तिचे मुलाचे नाव- महेश दत्तात्रय पुडले असे असल्याचे सांगितले परंतू तिला त्याचा संपर्क क्रमांक सांगता येत नव्हता. त्यामुळे वरील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर मुलाचे नावावरून फेसबुक या सोशल मिडीयावर शोध घेतला असता, सदर मुलाचे फेसबुक अकाऊंट मिळून आले. त्यावरून त्याचा संपर्क क्रमांक प्राप्त करून घेवून त्यावर सदर मुलास फोन करून जेलरोड चौकीस बोलावून घेतले. सदरचा मुलगा हा सायंकाळचे सुमारास जेलरोड चौकी येथे आला व त्याने त्याचे नाव- महेश दत्तात्रय, पुंडले, रा. विलो हिल अपार्टमेंट, श्रीराम सोसायटी, फ्लॅट नं. १४, वारजे पुणे असे असल्याचे सागून सदर महिलेस ओळखून ती त्याची आई असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे स.पो.निरी.श्री. राहूल गिरमकर यांनी त्याचेकडे अधिक चौकशी करून सदर महिलेस तिचे मुलाचे ताब्यात सुखरूप परत दिले. पोलीसांनी केलेल्या या सहकार्याबद्दल सदर महिला व तिचे मुलाने पोलीसांचे आभार मानले.

अशा प्रकारे येरवडा पोलीस स्टेशन कडील जेलरोड पो.चौकीचे सहा.पो.निरी. राहूल गिरमकर, पो.हवा. ३३५७ नामदेव सुपे, पो.ना. २९८८ किसन भारमळ, पो.शि. राजेंद्र ढोणे यांनी हरविलेल्या एका वयोवृध्द महिलेच्या मुलाचा फेसबुक या सोशल मिडीयाचे आधारे शोध घेवून त्यास संपर्क साधून जेलरोड चौकी येथे बोलावून घेवून सदर महिलेस तिचे मुलाचे ताब्यात सुखरूप परत देऊन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



